# श्रीपाद सेवा मंडळ : केंद्र वृत्तांत

सौ.सुप्रिया देशपांडे

——

**भगवान श्रीदत्तात्रेय जयंती महोत्सव; श्रीक्षेत्र दत्तधाम (हेळवाक) :**

मार्गशीर्ष पौर्णिमा हा भगवान श्रीदत्तात्रेयप्रभूंच्या जयंतीचा दिवस. समस्त श्रीदत्तभक्त, या दिवशी मोठ्या आनंदाने श्रींचा जयंत्युत्सव साजरा करतात. संध्याकाळी देवांची पालखी निघते आणि दुसऱ्या दिवशी पारण्याच्या वेळी महाप्रसादाने उत्सवाची सांगता होते.

**'श्रीपाद सेवा मंडळा'**च्या हेळवाक येथील 'श्रीदत्तधाम' या प्रकल्पस्थानी, प्रतिवर्षीचा श्रीदत्तात्रेय जयंतीचा मुख्य उत्सव साजरा होतो. तसेच पुण्यासहित इतर सर्वच केंद्रांतून त्या त्या ठिकाणचे स्थानिक साधक-भक्त हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करतात.

या वर्षी, दिनांक १ डिसेंबर २००९ रोजी, संध्याकाळपासूनच या जयंत्युत्सवाच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली.

हेळवाकला, श्रीक्षेत्र दत्तधाम येथे गडावर, भगवान श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचे मंदिर आहे. तेथेच प.पू.सद्गुरु श्री.मामांचे देखील नामसमाधी-मंदिर आहे. या नामसमाधीच्या मागेच भगवान श्रीपांडुरंगविठ्ठल व श्रीरुक्मिणीमाता यांच्या अतिशय सुंदर, सुहास्यवदन मूर्ती आहेत.

या महोत्सवाच्या तयारीसाठी, कऱ्हाडचे साधक अतिशय प्रेमाने आणि तत्परतेने नेहमीच आधीपासूनच झटत असतात. अगदी पायऱ्या रंगविण्यापासून ते सजावट-रोषणाईपर्यंत आणि पालखी-व्यवस्थेपासून ते महाप्रसादाच्या व्यवस्थेपर्यंत सर्वच कामांत प.पू.सौ.ताई व प.पू.श्री.दादांच्या मार्गदर्शनाप्रमाणे हे सर्व साधक-भक्त अतिशय प्रेमाने आणि भक्तिभावाने सेवातत्पर असतात.

दिनांक १ डिसेंबर रोजी सकाळपासूनच रांगोळ्या, सजावट इत्यादींमधून मुंबई, पुणे, कऱ्हाड अशा विविध केंद्रांतून आलेल्या स्वयंसेवकांचा उत्साह जाणवत होता. श्रींच्या दर्शनार्थ येणाऱ्या भाविकांसाठी, मंदिर दिवसभर उघडे ठेवण्यात आले होते. पंचक्रोशीतून येणाऱ्या अनेक भाविक सज्जनांनी देवांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

सायंकाळी, **'श्रीदत्तभावांजली'**च्या सामुदायिक पठणाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सूर्यास्ताला श्रीदत्तजन्माच्या सुमारास, 'श्रीगुरुचरित्रा'तील श्रीदत्तजन्माचा चौथा अध्याय वाचण्यात आला आणि त्यानंतर श्रीदत्तजन्माचा सोहळा उत्साहाने साजरा करण्यात आला. त्यावेळी देवांची आरती आणि मंत्रपुष्पांजली झाली.

सर्वच उपस्थित यानंतर होणाऱ्या पालखी-सोहळ्यासाठी अधीर झाले होते. अत्यंत सुंदर पुष्पमाळांनी सजवलेली देवांची पालखी मंदिरासमोर आणण्यात आली. छत्र-चामरे, चंद्र-सूर्य, अब्दागिरी, देवांचा दंड अशा सर्वच भूषणांसह सज्ज असलेल्या सकलऐश्वर्यमंडित पालखीमध्ये, प.पू.सौ.ताईंच्या हस्ते देवांच्या पादुकांची व त्यांच्या प्रतिमांची स्थापना करण्यात आली. **'धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ।'** या भावमंगल स्वरांनी पालखी प्रदक्षिणेला प्रारंभ झाला आणि आसमंत दुमदुमून गेला. त्यानंतर श्रीभगवंतांच्या नामगजरात, त्यांच्या बिरुदावलीचा उच्चरवाने उच्चार करीत, **'इंदुकोटितेजपूर्ण ।'**, **'कै मजलागी भेटसी बा ताता । दत्तराया, अगा अवधूता ।।'**, करुणात्रिपदी इत्यादी भावपूर्ण अभंग गात, अत्यंत प्रसन्न वातावरणात तीन प्रदक्षिणा पूर्ण करून पालखीचा सोहळा संपन्न झाला. त्यानंतर सर्वांनी देवांचे मनोभावे दर्शन घेतले. तीर्थप्रसाद झाल्यावर संध्याकाळच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी १० ते ११ या काळात, साधक-स्वयंसेवकांसाठी प्रश्नोत्तरांचा वेळ राखून ठेवण्यात आला होता. साधना व सद्ग्रंथवाचनाच्या अनुषंगाने त्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना, प.पू.सद्गुरु सौ.ताईंनी व प.पू.सद्गुरु श्री.दादांनी अत्यंत सुबोध शब्दांत समाधानकारक उत्तरे देऊन, त्यांच्या शंकांचे मुळातूनच निरसन केले. दुपारी देवांचा नैवेद्य झाल्यावर, महाप्रसादाने संपूर्ण कार्यक्रमाची सांगता झाली.

अत्यंत तृप्त मनाने, अतीव आनंदात देवांचे, प.पू.सद्गुरु श्री.मामांचे आणि प.पू.सौ.ताई व प.पू.श्री.दादांचे दर्शन घेऊन, सर्व स्वयंसेवक आपापल्या स्थानी रवाना झाले.

□□